MHAH220005602025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१००/२०२५**

प्रियंका निलेश रासकर वि. निलेश दिलीप रासकर व इतर

**<u>निशाणी क्रमांक ६ वरील आदेश</u>**

अर्जदार यांनी घरगुती हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ कलम १२ अन्वये सामनेवालांविरुध्द अर्ज दाखल केलेला आहे. त्यात सदर कायद्याचे कलम २३ अन्वये सामनेवाला यांचे कडुन तिला "तुर्तातुर्त पोटगी" मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिचे सदर अर्जाच्या अनुषंगाने थोडक्यात कथन असे की, तिचे लग्न सामनेवाला क्र.१ याचेबरोबर हिंदु धर्मशास्त्र रितीरीवाजाप्रमाणे दि.३०/१२/२०१८ रोजी साईकृपा मंगल कार्यालय, मिरजगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे झाला. सामनेवाला क्र. २ हे अर्जदार हिचे सासरे, सामनवोला क्र. ३ ही अर्जदाराची सासु, सामनेवाला क्र. ४ ही अर्जदार हिची नणंद आहे.

३. अर्जदार हिने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचेमध्ये नवरा बायकोचे नातेसंबंध अद्यापपर्यंत कायम आहेत. लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यांचेकडे मौजे सराफवाडी येथे नांदण्यास गेली. लग्न झालेपासुन सुरुवातीचे ६ महिने सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हिस कसेबसे नांदविले. त्यानंतर सामनेवाला क्र. १ हा नेहमी अर्जदार हिस शेजारी कोणाशीही बोलु देत नसे, मोबाईलवर माहेरी आईवडीलांशी बोलु देत नसे व कायम घालुनपाडुन बोलत असे. त्यास सामनेवाला क्र. २ ते ४ यांची फुस असे. सामनेवाला क्र. १ ते ४ हे अर्जदार क्र. १ हिचा छळ करीत असत. अर्जदार ही शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ सहन करुन तिच्या आईवडीलांच्या इज्ञतीखातर तेथेच नांदत होती.

४. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ ते ३ हे अर्जदार हिस शेतातील अवजड कामे तसेच गुरांची कामे करायला लावत असे व तिला जेवण देत नसे. सामनेवाला क्र. १ हा रात्रीचा दरवाजा लावुन अर्जदार हिस मारहाण करीत असे व अर्जदार हिस घरामध्ये कोंडुन बाहेरुन कुलुप लावुन निघुन जात असे. सामनेवाला क्र. २ हे देखील अर्जदारास शिवीगाळ करत असे व तिला नेहमी तुच्छ नजरेने व वाईट नजरेने पाहत असे. अर्जदार ही घरातील आवश्यक वस्तु संपल्यानंतर सामनेवाला क्र. १ यास वस्तु घेऊन येण्यास सांगितले असता सामनेवाला क्र. १ ते ३ हे अर्जदार हिस मारत असत व तुझ्या माहेरी जाऊन तुझे वडीलांकडून घेऊन ये असे म्हणत असे. तसेच शेजारील महिलांशी बोलायचे नाही, घरी आलेल्या व्यक्तीपुढे यायचे नाही असा दम देत असत. सामनेवाला क्र. १ नोकरीवरुन घरी आल्यानंतर अर्जदार हिचा मोबाईल ताब्यात घेऊन तिची कॉलहिस्ट्री चेक करीत असे व अर्जदार हिने माहेरी फोन केल्याचे दिसताच सामनेवाला क्र. १ ते ३ हे अर्जदारास शिवीगाळ करत असे. सामनेवाला क्र. ४ ही अर्जदार हिची नणंद असुन तिला शेजारीच असलेल्या दुधाळ वस्ती येथे दिलेले असुन ती नेहमीच अर्जदार हिचे सासरी येत असते व सामनेवाला क्र. १ ते ३ यांचे मनात कलुशित भावना निर्माण करुन अर्जदार हिस घालुन पाडुन बोलत असे व सतत अपमान करुन मानसिक त्रास देत असे.

५. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ ते ४ हे अर्जदारास तिच्या माहेरवरुन घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये व २ तोळे सोन्याची अंगठी घेऊन ये असे म्हणुन हुंड्याची मागणी करुन अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ करीत असे. सामनेवाला क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिस मारहाण करुन तिचे माहेरी नेऊन सोडत असे व तिच्या आईवडीलांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत असे. पंरतु अर्जदार हिस प्रामाणिकपणे संसार करण्याची इच्छा असल्यामुळे अर्जदाराचे वडील

नातेवाईकांना मध्यस्थी करुन सामनेवाला क्र. १ ते ४ यांची समजुत काढुन पुन्हा नांदण्यात पाठवत असे. दरम्यानचे काळात सामनेवाला क्र. १ पासुन अर्जदार हिस गर्भधारणा झाली तरीही सामनेवाला क्र. १ च्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. दि. ३०/१०/२०२२ रोजी सामनेवाला क्र. १ यांचेपासुन अर्जदार हिस आरोही ही मुलगी झालेली आहे.

६. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, दि. १०/०३/२०२५ रोजी सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हिस शारिरीक व मानसिक त्रास दिल्यामुळे अर्जदार हिने तिच्या आईवडीलांना बोलावुन घेतले. अर्जदाराचे वडीलांनी त्यांचे नातेवाईक सचिन कोल्हे यांना घेऊन अर्जदार हिचे सासरी गेले व सामनेवाला क्र. १ ते ४ यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हिच्या आईवडीलांचे काहीएक ऐकले नाही व घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये आणुन द्या तेव्हाच मुलीला नांदायला घेऊन या अन्यथा तिला परत नांदविण्यास पाठवु नका असे म्हणुन अर्जदार हिचे वडील व नातेवाईक सचिन कोल्हे यांना शिवीगाळ करुन घराबाहेर काढले व मुलगी आरोही हिस घरामध्ये डांबुन ठेवले. त्यामुळे अर्जदार हिला मुलगी आरोही हिला सामनेवाला क्र. १ ते ४ यांचेकडे ठेऊन माहेरी यावे लागले.

७. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला यांनी कोणत्याही प्रकारचे संयुक्तीक कारण नसताना अर्जदार हिस घराबाहेर काढले व नांदविणेस स्पष्ट नकार दिला. त्यामुळे अर्जदार ही नाईलाजास्तव तिच्या माहेरी राहत आहे. सामनेवाला यांनी अर्जदार हिची अन्नवस्त्र, निवारा यांची काहीएक सोय केलेली नाही. अर्जदार हिस कामधंदा नसल्यामुळे तिला उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार ही तिचा स्वतःचा चरितार्थ भागविणेस असमर्थ आहे.

८. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला यांचे एकत्र कुटुंब असुन त्यांना मौजे सराफवाडी येथे ५ एकर बागायत शेतजमिन आहे. त्यामध्ये नेहमी ऊस, डाळिंब व द्राक्ष असे नगदी पीके घेतात त्यामुळे त्यांना प्रतिवर्षी २५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाले यांना ८ जर्सी गायी असुन त्यापासुन त्यांना दरमहा रुपये ५०,०००/– उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. १ हा सुदर्शन जिन्स प्रा. लि. लोणी देवकर एम.आय.डी.सी. ता. इंदापुर, जि. पुणे येथे सुपरवायझर या पदावर कार्यरत असुन त्यांस दरमहा रुपये ५०,०००/– पगार आहे. सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती सधन आहे. अर्जदार हिच्या पालनपोषणाची संपुर्ण जबाबदारी सामनेवालाची आहे. सदर अर्जाचा गुणदोषावर निकाल होणेस बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे अर्जदार हिस सामनेवाला क्र. १ यांचेकडुन अन्न, वस्त्र, निवारा व औषधोपचारासाठी दरमहा रुपये २५,०००/– तुर्तातुर्त पोटगी देण्याचा हुकूम व्हावा अशी अर्जदारातर्फे विनंती करण्यात आली आहे.

९. नि.क्र.१८ खाली अर्जदार क्र. १ ते ४ तर्फे मुळ अर्जास म्हणणे दिले व सामनेवाला क्र. १ याने नि.क्र.२० खाली अर्जदाराच्या अंतरिम पोटगीच्या अर्जास म्हणणे सादर केले आहे. सामनेवाला यांनी अर्जदाराच्या अर्जातील कथन नाकारलेली आहेत. सामनेवाला यांनी अर्जदारासोबतचे असलेले नातेसंबंध व लग्न झाल्याबद्दलचा मजकूर मान्य केलेला आहे.

१०. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचे लग्न दिनांक ३०/१२/२०१८ रोजी मौजे मिरजगाव, ता. कर्जत जि. अहमदनगर येथे झालेले असुन सदर विवाहात अर्जदारास दोन तोळे सोन्याचे दागिने घालुन सदर लग्नाचा खर्च ३ ते ४ लाख सामनेवालाचे आई वडीलांनी केलेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाला क्र. १ कडे नांदायला आल्यानंतर सुरुवातीचे १ वर्षे

अर्जदार ही व्यवस्थीत नांदली. त्यानंतर मात्र अर्जदार ही घरामध्ये दिवस–दिवस झोपुन राहणे, उलटसुलट बोलणे, घरातील लोकांना अर्वाच्च शब्दात शिवीगाळ करत असे. अर्जदार हिच्या वागण्यात फरक पडेल या आशेवर सामनेवाला क्र. १ ते ४ हे तिला व्यवस्थित नांदवित राहिले. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ बरोबर भांडणतंटा करत होती व तिच्या आईवडीलांना सासरी बोलवुन सामनेवाला क्र. १ ते ३ यांचेबरोबर भांडण करुन माहेरी निघुन जात होती. सामनेवाला क्र. १ ते ३ हे नातेवाईकांमार्फत तडजोड करुन अर्जदारास नांदायला घेऊन येत असे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ ते ४ यांना शारिरीक व मानसिक त्रास देत होती.

११. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिस सामनेवाला क्र. १ यांचेपासुन मुलगी झाली. त्यानंतर अर्जदार ही घरातील कोणतेही कामे न करत आईबरोबर फोनवर बोलत असे व उलटसुलट उत्तर देत असे व लहान मुलीसही अर्जदार ही सतत मारहाण करत असे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यास औषध पिण्याचे तसेच फास घेऊन आत्महत्या करण्याची धमकी देत असे व मुलगी आरोही हिस नीट सांभाळत नव्हती. सन २०२४ चे सुमारास अर्जदार ही भांडण करुन माहेरी गेली असता मुलगी आरोही ने सामनेवाला यांची आठवण काढली असता तिला डोक्यावर मारहाण केली म्हणुन सामनेवाला क्र. १ यांनी मुलीला घरी आणले व अनुपम हॉस्पिटल ॲण्ड लेझर सेंटर अकलुज येथे उपचारासाठी घेऊन गेले.

१२. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, दि.१०/०३/२०२५ रोजी किरकोळ वाद झालेने अर्जदार व अर्जदाराने तिच्या आईवडीलांना बोलावुन घेतले. अर्जदार हिच्या वडीलांनी सामनेवाला क्र. १ यांना शिवीगाळ करुन 'तुला पाहुन घेतो व कोर्टामार्फत १५ लाख पोटगी मागतो' अशी धमकी दिली. अर्जदार ही सर्व कपडे व दागिने ३ तोळे सोने तसेच कपाटामध्ये पीक कर्ज भरण्यासाठी ठेवलेले ९०,०००/–

रुपये घेऊन गेली. अर्जदार ही तिच्या मुलीला सामनेवाला क्र. १ ते ३ यांचेकडे ठेऊन सामनेवाला यांच्याशी भांडणतंटा करुन निघुन गेली. त्यावेळी सामनेवाला क्र. १ यांनी मुलगी लहान असल्यामुळे अर्जदारासोबत ठेवण्यास सांगितले असता अर्जदार हिची आई 'मुलगी मेली म्हणुन सोडुन दे' असे म्हणाली. सामनेवाला यांनी अर्जदारास नांदवण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदाराने नांदण्यास नकार दिला. सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदारास फोनद्वारे नांदणेय येण्याची विनंती केली परंतु अर्जदार ही माहेरी गेल्यानंतर सोशल मिडियावर मंगळसुत्र काढुन ठेऊन पोस्ट करणे लग्न न झाल्यासारखे वागत असे व अर्जदारास शिवीगाळ करत असे व फोन बंद करुन ठेवत असे. सामनेवाला क्र. १ ते ३ व त्यांचे नातेवाईकांनी अर्जदाराची समजुत घालण्यासाठी फोन केला तर अर्जदार व तिचे घरचे सामनेवाला क्र. १ यास मारहाण करण्याची व केस करण्याची धमकी देत असे. सामनवोला क्र. ४ ही मौजे दुधाळ वस्ती, शेळगाव येथे राहत असल्याने अर्जदारास मानसिक त्रास देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

१३. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिच्या माहेरकडील आर्थिक परिस्थिती चांगली आहे. अर्जदार हिचे वडील नुतन महाविद्यालय कर्जत येथे लिपीक म्हणुन कार्यरत असुन त्यांना दरमहा रुपये ८०,०००/- वेतन मिळते. अर्जदाराच्या वडीलांकडे त्यांच्याकडे अलिशान घर, चारचाकी गाडी, २० गाईंचा गोठा आहे. त्यातुन त्यांना एकुण दरमहा उत्पन्न रुपये १,२५,०००/- मिळते. अर्जदार ही माहेरी स्वच्छंदी जीवन जगत आहे. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांची मुलीचे पालनपोषण सामनवोला क्र. १ हेच करीत आहेत. त्यामुळे अर्जदार यांना पोटगी देण्याची गरज नाही. सामनेवाला क्र. १ यांचेकडे सव्वा एकर क्षेत्र आहे व दुग्धव्यवसायातुन त्यांना ५ ते ७ हजार मिळतात. सामनेवाला हे कंपनीमध्ये काम करीत असुन त्यांना दरमहा ओव्हरटाईम करुन २५,०००/- रुपये मिळतात. मुलगी आरोही ही सामनेवाला क्र. १

यांच्याकडे असल्यामुळे तिच्याही पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ यांच्यावर आहे. तसेच सामनेवाला क्र. १ याचे आईवडील सतत आजारी असतात व त्याच्या वडीलांना पॅरेलेसिस आजार असल्यामुळे उपचाराचा खर्च ही सामनेवाला क्र. १ यांचेवरती आहे. त्यामुळे सामनेवाला क्र. १ यांची अर्जदारांना अंतरिम पोटगी देण्याची ऐपत नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा व सामनेवाला यास खर्चात टाकले म्हणुन रक्कम रुपये २०,०००/- नुकसान भरपाई मिळावी अशी सामनेवाला यांनी विनंती केली आहे.

१४. सदर अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थितीत झालेले आहेः-

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सकृतदर्शनी अर्जदार यांनी त्यांच्यावर सामनेवाला यांनी कौंटुबिक हिंसाचार केल्याचे सिध्द केले आहे काय ? | होय. |
| २. | सकृतदर्शनी सामनेवाला यास पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे काय ? | होय. |
| ३. | सकृतदर्शनी अर्जदार ही सामनेवालाकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

१५. अर्जदार यांनी नि.क्र.३ सोबत अर्जदार व सामनेवाल क्र. १ यांच्या लग्नाची पत्रिका व फोटो दाखल केले आहे. तसेच अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांनी

मालमत्ता व दायित्वचे प्रतिज्ञापत्र अनुक्रमे नि.क्र.२२ व २३ वर दाखल केले आहे.

**मुद्दा क्र.१ बाबत–**

१६. अर्जदाराने तिचा अर्ज नि.क्र. १ व शपथपत्रामध्ये असे कथन केले आहे की, लग्न झालेपासुन सुरुवातीचे ६ महिने सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हिस कसेबसे नांदविले. त्यानंतर सामनेवाला क्र. १ हा नेहमी अर्जदार हिस शेजारी कोणाशीही बोलु देत नसे, मोबाईलवर माहेरी आईवडीलांशी बोलु देत नसे व कायम घालुनपाडुन बोलत असे. त्यास सामनेवाला क्र. २ ते ४ यांची फुस असे. सामनेवाला क्र. १ ते ४ हे अर्जदार क्र. १ हिचा छळ करीत असत. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ ते ४ हे अर्जदारास तिच्या माहेरवरुन घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये व २ तोळे सोन्याची अंगठी घेऊन ये असे म्हणुन हुंड्याची मागणी करुन अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ करीत असे. अर्जदाराने असे कथन केले आहे की,सामनेवाला क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिस मारहाण करुन तिचे माहेरी नेऊन सोडत असे व तिच्या आईवडीलांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत असे. अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची सोय सामनेवालाने केली आहे असे दिसून येत नाही. एखादी भारतीय स्त्री तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याशिवाय विनाकारण न्यायालयात कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार करणार नाही. तसेच अर्जदाराने दाखल केलेल्या शपथपत्रात कथन कले आहे की, तिच्यावर सामनेवालाने हिंसाचार केलेला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, अर्जदारावर सामनेवाला क्र. १ ते ४ कडून कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. त्यामुळे मुद्या क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्या क्र. २ व ३ बाबतः–</u>**

१७. अर्जदारने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, सामनेवाला यांचे

एकत्र कुटुंब असुन त्यांना मौजे सराफवाडी येथे ५ एकर बागायत शेतजमिन आहे, त्यामध्ये नेहमी ऊस, डाळिंब व द्राक्ष असे नगदी पीके घेतात त्यामुळे त्यांना प्रतिवर्षी २५ लाख रुपये उत्पन्न मिळते. अर्जदाराने असे कथन केले आहे की, सामनेवाले यांना ८ जर्सी गायी असुन त्यापासुन त्यांना दरमहा रुपये ५०,०००/- उत्पन्न मिळते, सामनेवाला क्र. १ हा सुदर्शन जिन्स प्रा. लि. लोणी देवकर एम.आय.डी.सी. ता. इंदापुर, जि. पुणे येथे सुपरवायझर या पदावर कार्यरत असुन त्यांस दरमहा रुपये ५०,०००/- पगार आहे. सामनेवालाने असे कथन केले आहे की, अर्जदार हिचे वडील नुतन महाविद्यालय कर्जत येथे लिपीक म्हणुन कार्यरत असुन त्यांना दरमहा रुपये ८०,०००/- वेतन मिळते. सामनेवालाने असे कथन केले आहे की, अर्जदाराच्या वडीलांकडे २० गाईंचा गोठा आहे, त्यातुन त्यांना एकुण दरमहा उत्पन्न रुपये १,२५,०००/- मिळते व अर्जदार ही माहेरी स्वच्छंदी जीवन जगत आहे. सामनेवालाने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांची मुलीचे पालनपोषण सामनवोला क्र. १ हेच करीत आहेत, त्यामुळे अर्जदार यांना पोटगी देण्याची गरज नाही. सामनेवाला क्र. १ हे निश्चीतपणे कोणती नोकरी करतात व त्यांना निश्चीत किती वेतन आहे याबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. नि.क्र.२३ खाली सामनेवालाचे मालमत्ता व दायित्वबाबतच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, त्याने मान्य केले आहे की, त्याचे १२ वी आयटीआय चे शिक्षण झाले आहे व त्याला १६,८००/- रुपये दरमहा पगार व ओव्हरटाईम केला तर दरमहा रुपये २५,०००/- पगार आहे. नि.क्र.२२ खालील अर्जदाराच्या मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता अर्जदाराचे शिक्षण बी.एससी. झालेले आहे व तिचे मासिक उत्पन्न काहीही नसल्याचे तिने नमुद केले आहे. या प्राथमिक तथ्यावरुन निश्चीतच अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे सुशिक्षीत असल्याचे दिसून येत आहे. सामनेवाला क्र. १ याने अभिलेखावर अर्जदार ही कमावती व्यक्ती असल्याचा

कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. सामनेवाला क्र. १ ने मान्य केले आहे की, तो २५,०००/– रुपये प्रतिमहा कमावतो. सामनेवाला क्र. १ हा अर्जदाराचा पती आहे. अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याची आहे. असे असताना देखील त्याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे.

१८. सद्या प्रचलित असलेली महागाई, अर्जदार व सामनेवाला यांची जबाबदारी, रहायचा व इतर खर्च याचा विचार करता अर्जदार ही सामनेवला क्र. १ कडून प्रति महिना ३,०००/– रुपये अर्जाच्या दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर मी वरीलप्रमाणे नोंदवित आहे. सबब, मुद्दा क्र.४ करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज (नि.क्र.६) अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ३,०००/– इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन देण्यात यावी.

३. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये १,०००/– (रक्कम रुपये एक हजार मात्र) द्यावा.

४. सदर आदेशाची एक प्रत उभय पक्षकारांना विनामूल्य द्यावी.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.09 18:21:40 +0530

ठिकाण – कर्जत
दिनांक – ०९/०३/२०२६

(आर. बी. राऊत)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,न्यायालय क्र.२
कर्जत, जि. अहमदनगर